
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय पाचवा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय पाचवा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

## श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

**E** Sahity Pratishthan

**E**leventh floor(G1102)

**E**ternity

**E**astern Express Highway

Thane, Maharashtra. 400604



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

---

॥ ॐ परमात्मने नमः ॥

## अध्याय पाचवा

# संन्यासयोग

### अर्जुन उवाच

मग पार्थ म्हणे श्रीकृष्णास । कैसा हा विरोधाभास । प्रशंसितो तू युद्धास । सांगून ज्ञान ॥१॥
सांगतो महती संन्यासाची । नि गोष्ट करतोस युद्धाची । माझे मनी स्थिती गोंधळाची । उपजली असे ॥२॥
दुटप्पी बा तुझे बोलणे । मी अज्ञानी न जाणे । होईल माझे कल्याण ज्याने । ते सांग मजला ॥३॥
सांग एकाच त्या मार्गाला । सोडून त्या दुटप्पीपणाला । जे समजेल माझ्या मतीला । ते सांग देवा ॥४॥
देवा याचसाठी तुम्हास । मी विनंती केली होती खास । संकेतात्मक त्या भाषेस । त्यागावे देवा ॥५॥
भगवंता तू प्रज्ञावान । कर्म संन्यास दोहोतून । मार्ग जो करेल मम कल्याण । तो सांग मजला ॥६॥
जो परिणाम चांगला देईल । आचरण्या सोपा असेल । ऐसा मार्ग सरल । सांगा देवा ॥७॥
निद्रेचे सुख न मोडता । पालखीसारखी ज्याची सहजता । ऐसा मार्ग आता । करावा कथन ॥८॥
या अर्जुनाचिये बोले । भगवंत मनी प्रसन्न झाले । मग काय ते म्हणाले । ऐका आता ॥९॥
कामधेनु जैसी गाय । जयाच्या पदरी होय । त्यासी उणे कधी ते काय । पडेल कां ॥१०॥
पहा तो शंकर भगवान । त्या उपमन्यूची करुणा येऊन । क्षीरसागरच टाकला देऊन । दूधभाता ॥११॥
ऐसा तो औदार्यवान । प्रसन्न होता तो श्रीकृष्ण भगवान । मग सर्व सुखांचं प्राप्त होणं । आपोआप ॥१२॥
यात चमत्कार तो कोणता । विष्णुभगवान प्रसन्न होता । मग सर्व गोष्टींची प्राप्यता । आपोआप ॥१३॥
अर्जुनाने जे विचारले । नि भगवंताने सांगितले । तेच सांगेन तेतुले । तुम्हा आता ॥१४॥

### श्री भगवान उवाच

संन्यास वा कर्मयोग आचरण । दोन्ही करती कल्याण । परि तू निष्काम होऊन । कर्म कर अर्जुना ॥१५॥
ज्ञानी स्वयेचि पोहती । अज्ञानी नावेत बैसती । जी स्त्रिया बाळांची गती । जाणतोस तू अर्जुना ॥१६॥
ऐसा सारासार विचार करून । सोपा कर्ममार्ग अनुसरून । संन्यासास प्राप्त होणं । योग अर्जुना ॥१७॥
आता तुज सांगेन । संन्यासाचे ते चिन्ह । मग दोहोचे अभिन्नपण । जाणशील तू ॥१८॥
आठवण न काढी भूतकाळाची । नि चिंता न करी भविष्याची । ऐसी स्थिती निष्कामतेची । मेरू जैसा ॥१९॥
मी माझी ऐसी आठवण । विसरले जयाचे अंत:करण । तोच संन्यासी जाण । पार्था तू ॥२०॥
निष्काम होता मती । सर्व इच्छाच संपून जाती । तीच आत्मतृप्तीची स्थिती । जाण अर्जुना ॥२१॥
आता घरदार प्रपंचता । काहीच न ती त्यागता । वसे अंतरी नि:संगता । त्यांच्या अर्जुना ॥२२॥
विस्तव विझून जाता । राख उरे ती तत्त्वत: । कापसाने जी धरू जाता । न जळे कापूस ॥२३॥
तैसा दिसे तो कर्मात । परि तो कर्मबंधातीत । तयाच्या त्या बुद्धीत । संकल्प नाही ॥२४॥
मनइच्छांची होता सांगता । प्रकटते ती संन्यासता । हीच ती अभेदता । दोहोमार्गी ॥२५॥
एऱ्हवी तरी पार्था । जे मूर्ख असती सर्वथा । ते सांख्ययोग अभेदता । जाणतीच ना ॥२६॥
सहज त्यांचे ठिकाणी अज्ञान । म्हणोनी म्हणती हे भिन्न । एऱ्हवी दोन्ही मार्ग अभिन्न । जाण अर्जुना ॥२७॥
सम राहता अनुभवांप्रति । आत्मतत्त्वाची येते प्रचीती । संन्यासयोग स्थिती । नांदे तेथे ॥२८॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सांख्यास जे प्राप्त होते । योग्यासही तेच मिळते । जाणणे ऐसे दोहाते । तेचि ज्ञान ॥२९॥
आकाश आणि अवकाशा । भेद नाही तो जरासा । तैसे योग संन्यासा । अभिन्नत्व अर्जुना ॥३०॥
स्वयेचि जे जग जाहले । जग स्वत:ठायी पाहिले । तेणे सांख्ययोगा जाणले । भेदेविण ॥३१॥
ऐसे युक्तीपूर्वक कर्म अनुसरून । जावे मोक्षपर्वत चढून । मग ते मोक्ष निधान । हाता येते ॥३२॥
कर्मसिद्धांत न जाणता । केवळ संन्यास तो घेता । ऐसी कर्म पलायनता । दु:खदायी ॥३३॥
जयांनी मनोभ्रमास जाणले । गुरुवाक्ये मन धुतले । मग ते आत्मस्वरूपी पावले । आपोआप ॥३४॥
जोवरी समुद्री न पडणे । तोवरी मिठाचे पृथक भासणे । संपते पृथकपणाचे भासणे । समुद्री विरघळता ॥३५॥
तैसे मन इच्छांची होता सांगता । चैतन्यी एकरूप होता । मग अंतरी विश्वात्मकता । प्रकटते अर्जुना ॥३६॥
मग कर्म-कर्त्याची कहाणी । जात असे खुंटूनी । जरी कर्माची रहाटणी । दिसे तेथे ॥३७॥
हे पार्था ज्या देहात । मीपणाच नाही स्मरत । तेथे कर्म ते समस्त । विरून जाई ॥३८॥
ऐसे देहत्यागावीण । प्रकटती दैवी ते गुण । निष्कामता ती संपूर्ण । त्याचेठायी ॥३९॥
बघ सर्वसामान्यांप्रमाणे । भासे तयाचे देह धारणे । परि निष्कामता प्रकटणे । तो गुण दैवी ॥४०॥
डोळ्यांनी तो पाहतो । नि कानांनी ऐकतो । परि तो कधीच न अडकतो । विषयात अर्जुना ॥४१॥
स्पर्शासी ते जाणणे । नि नाकाने वास घेणे । प्रसंगोचित्त ते बोलणे । घडे तयाठायी ॥४२॥
आहार तो घेणे । नि मलमूत्र त्यागणे । झोप आली की झोपणे । जी सहजावस्था ॥४३॥
तयाच्या स्वइच्छेकारणे । त्याचे चालते दिसणे । सकळ कर्माचे घडणे । दिसे तेथे ॥४४॥
श्वासोच्छ्वास करणे । डोळ्याची उघडझाप करणे । सर्वसामान्य ते भासणे । आढळे तेथे ॥४५॥
पार्था सर्वांचे ठायी । तो आत्मतत्त्व स्पष्ट पाही । मीपणाचा किंचित लवलेशही । नाही तेथे ॥४६॥
जो मनी निष्काम जाहला । मनोभ्रांतीतून सुटला । तो आत्मतत्त्वी पावला । ज्ञान होता ॥४७॥
आत्मतत्त्वी अधिष्ठान धरून । घडे त्याच्या इंद्रियाचे वर्तन । विषयात ते आसक्तपण । नसे तेथे ॥४८॥
दिव्याच्या त्या प्रकाशात । जसे घरातील व्यवहार होतात । तैसे अखिल कर्मजात । त्यांचे ठायी ॥४९॥
सर्व कर्म ते करून । तयाचे कर्मबंधातीत असणं । आणि निष्काम ते मन । खूण त्याची ॥५०॥
स्वार्थाची भाषा न जाणतो । नि मनी निष्काम असतो । तैसा देहधर्माचा व्यापार तो । त्यांचे ठायी ॥५१॥
योग्याठायी कर्मे घडती । जैसी बालकाची चेष्टा ती । स्वार्थाची ती मती । तेथे नाही ॥५२॥
रात्रीच्या समय काले । जेव्हा शरीर असे झोपले । तेथे मनचि राहे ऐकले । स्वप्नी जेवी ॥५३॥
नवल बघ धनुर्धरा । कैसा स्वप्न वासनेचा पसारा । देहा न लागू देता वारा । सुखदु:ख भोगी ॥५४॥
स्वप्नीची ती उठाठेव । इंद्रियांसी नाही जाणीव । तैसे तयाठायी घडावं । कर्म अर्जुना ॥५५॥
योगी ऐसे कर्म करती । परि कर्म तया न बांधती । जयांनी सोडली ती संगती । अहंभावाची ॥५६॥
वेड्याच्या त्या ठिकाणी । ती इंद्रियांची घडे करणी । परि बोध त्याच्या मनी । नसे काही ॥५७॥
स्वरूप तरी देखे । आळविले ते ऐके । शब्दही बोले मुखे । परि ज्ञान नाही ॥५८॥
तैसे ते हेतूवीण । तयाने जे जे करणं । ते केवळ कर्म जाण । इंद्रियांचे ॥५९॥
मग सर्वत्र जे जाणते । ते बुद्धीचे कर्म नसते । ओळख अर्जुना तयाते । म्हणे हरी ॥६०॥
ते बुद्धीचा उपयोग करती । चित्त देऊनी कर्मरत होती । परि निष्काम ती मती । त्यांचे ठायी ॥६१॥
बुद्धिपलीकडील तत्त्व जाणता । तेथे कैची अहंकारता । म्हणून कर्मबंधाची कथा । तेथे नाही ॥६२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अर्जुना कर्त्याशिवाय कर्म । तेचि बा नैष्कर्म्य । जाणणे हे वर्म । ज्ञान अर्जुना ॥६३॥
बुद्धिपलीकडील ते तत्त्व । जे मी असे सांगत । ते जे शब्दातीत । जाण अर्जुना ॥६४॥
जयाचा अहंम्भाव खुंटला । जो मनइंद्रियातून सुटला । तयासीच समजला । बोल माझा ॥६५॥

श्रोते उवाच

न सोडता ते सूत्र । न जाऊ देता विषय इतरत्र । उपदेशावे ते परत्र । आता तुम्ही ॥६६॥
जे इंद्रिया न कळते । बुद्धी ती त्यासी न जाणते । ऐसे जे मनातीत ते । सांगितले तू ॥६७॥
ऐसे जे शब्दापलीकडले । ते तुवा शब्दी गुंफले । तू शक्य ते सर्व केले । आता सांग कथा पुढची ॥६८॥
श्रोतियांनी विनंती करता । निवृत्तिदास जाहला बोलता । त्या संवादाची वार्ता । ऐका आता ॥६९॥
मग कृष्ण म्हणे अर्जुनाते । आता प्राप्ताचे चिन्ह पुरते । सांगेन तुज संपूर्ण ते । चित्त देई ॥७०॥
जो आत्मतत्त्वी पावला । तो मन इच्छातून सुटला । मग शांतीशी केला । घरोबा त्याने ॥७१॥
कामना मनी असता । कैची ती शांतता । कामनी त्या अडकता । अतिदु:ख अर्जुना ॥७२॥
जैसे फळाचिया हावे । अज्ञानी करी कर्म आघवे । तैसी फलेच्छा स्वभावे । नाही ज्ञान्या ॥७३॥
तयाठायी जे जे दिसते । ते आत्मतत्त्वच असते । तयाचे उद्‌गार ते । महावाक्य ॥७४॥
देहात तो असूनही । तेथे कर्तेपण नाही । सर्वकाही करुनही । अकर्ताच तो ॥७५॥
जैसा तो परमेश्वर । असूनही निर्गुण निराकार । परि त्रिभुवनाचा व्यापार । तयाचे ठायी ॥७६॥
कैसे म्हणावे कर्ता तयाला । कर्मचि न लिंपे जयाला । कर्म घडूनही तो राहिला । कर्मातीत ॥७७॥
निर्विकल्प ते राहून । कर्त्याविण कर्म करून । पंचमहाभूतांचे ते उभारणं । त्याचेच ठायी ॥७८॥
सर्वांचा तो जीव असे । परि कोणाचा काही नसे । जग प्रकटे वा नाशे । तो जैसा तैसा ॥७९॥
कुणाचेही पाप वा पुण्य । परमात्मा नाही करत ग्रहण । सर्व घडामोडी त्या जाणून । मुक्त तो ॥८०॥
अमूर्त तो असून । प्रकटतो मूर्तिरूप होऊन । परि तयाचे ते अमूर्तपण । अखंडित अर्जुना ॥८१॥
तो सृजी पाळी संहारी । ऐसे बोलती जे चराचरी । ते अज्ञान गा अवधारी । पंडुकुमारा ॥८२॥
अज्ञान समूळ संपता । भ्रांती ती नाश पावता । समजते मग  अकर्तृत्वता । ईश्वराची ॥८३॥
होता ते आत्मज्ञान । येते ईश्वरत्वाची जाण । मग मी आणि ईश्वरपण । भिन्न नाही ॥८४॥
ऐसे ज्ञान प्रकटता चित्ता । जगासी स्वत:चे एकत्व जाणता । मग जगच तो होतो तत्त्वत: । तीच मुक्ती ॥८५॥
पूर्वेस तो सूर्य उगवता । प्रकटते ती प्रकाशदिव्यता । आणि सर्व दिशांचीही अंधारता । संपून जाई ॥८६॥
आत्मतत्त्व ते अनुभवून । जयाचे ब्रह्माकार झाले मन । मग जन्ममरण उल्लंघून । निर्वाण होई ॥८७॥
ऐसे व्यापक ज्ञान भले । जयाच्या अंतरी प्रकटले । मग आपोआप समत्व पावले । मन तयाचे ॥८८॥
ते स्वत:स विश्व जाणती । नी विश्व तेचि होती । ऐसी येणे अंतरी अनुभूती । ते आत्मज्ञान ॥८९॥
जैसी त्या धनवाना । नसे दारिद्र्याची कल्पना । वा त्या विवेकवाना । भ्रांती नाही ॥९०॥
त्या अंधाराची कथा । सूर्यास न माहीत सर्वथा । वा मृत्यूची ती व्यथा । अमृता नाही ॥९१॥
कैसी असे ती उष्णता । चंद्रास नाही पत्ता । तैसी न जाणती भेदता । ज्ञानी जन ॥९२॥
डास अथवा गज । चांडाळ वा द्विज । परका वा आत्मज । तेथे भेद नाही ॥९३॥
ही गाय हे श्वान । हा श्रेष्ठ हा हीन । जागृतास का स्वप्न । पडते कधी ॥९४॥
अहंभाव असता अंतरी । भेद दिसतो बाहेरी । संपता अहंभावाची शिदोरी । भेद नाही ॥९५॥


For Complete Dnyaneshwari Visit :  www.esahity.com

म्हणून सर्वत्र राहतो सम । जाणुनी आपणचि अद्वैत ब्रह्म । हेचि अर्जुना वर्म । ज्ञानियाचे ॥९६॥
इंद्रियासी न दंडिता । विषयसंग न सोडता । भोगे अंतरी नि:संगता । कामनेवीण ॥९७॥
संसारात या राहून । लोकाचार तो आचरून । परि मुक्त तो लौकिकातून । अंतरी अर्जुना ॥९८॥
अदृश्य जीव असती आकाशात । परि डोळ्यास नाही ते दिसत । तैसे यास नाही ओळखत । जग अर्जुना ॥९९॥
जैसे पवनाचेनि मेळे । जळचि जळी लोळे । तैसे हा जगती खेळे । जे आत्मतत्त्व ॥१००॥
अर्जुना नामरूप तयाचे । जे ब्रह्मचि असे साचे । म्हणून लक्षण समत्वाचे । त्याचे ठायी ॥१०१॥
ऐसे सम जयाचे मन । ऐक तयाचे लक्षण । थोडक्यात मी सांगेन । ऐक अर्जुना ॥१०२॥
मृगजळाचा येता पूर । वाहून का जातात डोंगर । तैसे शुभ अशुभाचा विचार । उठेच ना ॥१०३॥
ऐसी समत्व दृष्टी प्रकटता । जो स्वयेचि ब्रह्म सर्वथा । मुक्तीची ती संपूर्णता । तेथे अर्जुना ॥१०४॥
आत्मस्वरूपी स्थिर होता । तुटते ती इंद्रिय तादात्म्यता । विषयांची ती आसक्तता । तेथे नाही ॥१०५॥
आत्मतत्त्वास अनुभवता । अंतरी प्रकटते ती तृप्तता । म्हणून विषयांची वार्ता । नसे तेथे ॥१०६॥
घेऊन कमलदलाचे पान । चकोर चंद्रकिरण करी सेवन । तो वाळवंटातील वाळूकण । खाईल कसा ॥१०७॥
तैसे जयाठायी आत्मसुख उपजले । जयाने स्वत:चे ब्रह्मत्व जाणले ।तयाचे सर्व विषय सुटले । आपोआप ॥१०८॥
या विषयांच्या नादात । कोण लोक अडकतात । जाऊन जरा खोलात । पाहू आपण ॥१०९॥
जे स्वत:स न ओळखती । तेच इंद्रियांसी रमती । जैसे कोंडा तो खाती । दरिद्री ते अर्जुना ॥११०॥
पहा तहान लागता हरिण । मृगजळा सत्य समजून । वैराण जागी ते जाऊन । शोध घेती ॥१११॥
तैसे जया नाही आत्मज्ञान । ते सुख समाधानाच्या आशेनं । इंद्रिय करती ते सेवन । करंटे ते ॥११२॥
इंद्रिय-विषयात सुख आहे । हे बोलण्यासारखे नव्हे । कडाडणारी वीज का आहे । उपयोगाची कधी ॥११३॥
पाऊस उन्हापासून संरक्षण ।जर होई ढगांच्या कारण ।मग घर तीन मजली बांधणं ।कशासाठी अर्जुना ॥११४॥
म्हणून विषयसुख शब्द उच्चारणे । ते वायाचि गा बोलणे । जैसे मधुर ते म्हणणे । विषकंदा ॥११५॥
क्रूर ग्रहाचे नाव मंगळ । वा मृगजळ मानणे जळ । तैसे सुख म्हणणे ते बाष्कळ । विषयांसी अर्जुना ॥११६॥
भाषा केवळ बोलायची । सांग सावली नागफणीची । होईल का कधी कल्याणाची । उंदरासी अर्जुना ॥११७॥
जैसे गळासी आमिष लावणे । तैसे विषयात सुख मानणे । सेवन करताच ते मरणे । माश्याचे जसे ॥११८॥
विरक्तांच्या त्या दृष्टीनं । विषय भोगून पुष्ट होणं । ते पंडुरोगा समान । जाण अर्जुना ॥११९॥
म्हणून विषयभोगाचे सुख । ते आत बाहेर सर्व दु:ख । परि सेवती ते मूर्ख । अज्ञानपणे ॥१२०॥
प्राप्त होऊन त्या अज्ञाना । राहती ना विषय सेविल्याविना । सांग पुवातील किड्यांना । किळस का वाटते ॥१२१॥
अज्ञजना अज्ञानासी प्यार । विषय चिखलातील जे दर्दुर । येतील का पाण्याबाहेर । मासे कधी ॥१२२॥
जर दु:ख भोगून । विरक्ती झाली असती उत्पन्न । मग दु:खयोनी गेल्या असत्या संपून । जाण अर्जुना ॥१२३॥
मग गर्भासी येणे । नि जन्ममरण भोगणे । भवचक्र ते चालणे । खुंटेल की ॥१२४॥
जर भोगी भोग सोडतील । मग महादोष ते संपतील । नि संसाराचे लटिकत्व होईल । खोटे जगती ॥१२५॥
अज्ञानाने जया ग्रासिले । तयांनीच भवचक्र चालविले । जयांनी दु:खा मानले । सुख अर्जुना ॥१२६॥
म्हणून चूक या कारणे । विषयात सुख शोधणे । जे अज्ञानपणे जिणे । जाण तू अर्जुना ॥१२७॥
म्हणून विरक्त त्या ज्ञान्यांनी । विषयसुखासी त्यागुनी । त्याजिले विषय अंतरातुनी । सदैव अर्जुना ॥१२८॥
ज्ञानियांच्या जीवनात । विषयच ते नाही असत । होऊन देहमनइंद्रियातीत । राहती सदा ॥१२९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

नसते बाह्य सुखाची भाषा । नि मनी नसते ती आशा । जयांच्या विरल्या सर्व आकांक्षा । ते सुखी अर्जुना ॥१३०॥
परि तेथे नसे द्वैतपण । जे अद्वैताचे ठिकाण । भोगतेपणाची ती जाण । तेथे नाही ॥१३१॥
सुषुप्तीचा ओलांडून डोंगर । जो अद्वैती जाहला स्थिर । मग आत्मसुख ते अपार । प्रगटे तेथे ॥१३२॥
कैसे ते अद्वैतपण । भेटे तो आपल्याशी आपण । जैसे जळाचे एकपण । जळी मिसळता ॥१३३॥
जैसा आकाश वायू व्यापे । तेथे दुजेपण ते लोपे । ऐसी एकरूपता स्वस्वरूपे । ती ब्रह्ममयता ॥१३४॥
मग द्वैताची भाषा संपते । अद्वैतपण ते उरते । ऐसे साक्षी तत्त्व ते । ते ब्रह्म अर्जुना ॥१३५॥
परमतत्त्व ते आघवे । शब्दाने काय वर्णावे । ते अंतरीच बा अनुभवावे । अर्जुना तू ॥१३६॥
ऐसे आत्मतत्त्वी रंगले । आपणचि आपणा पावले । जयानी ते अनुभवले । आत्मतत्त्व ॥१३७॥
तेथे आनंद तो अपार । जे सुखाचे ते अंकुर । महाबोधात तो विहार । केला त्यांनी ॥१३८॥
ते विवेकाचे गाव । परब्रह्म त्यांचा स्वभाव । अविद्येचे ते नाव । नाही तेथे ॥१३९॥
तेथे केवळ असणेपण । जी चैतन्याची ती खूण । ऐसे ऐकेक वर्णन । करशील किती ॥१४०॥
आत्मतत्त्वाची ती कथा । अधिक ती न बोलता । कृष्ण अर्जुन संवादता । वर्णावी पुढे ॥१४१॥
अतिरेक बाजूस ठेवून । ग्रंथसार कर कथन । होऊ दे ते ज्ञान प्रकटन । साधु हृदयी ॥१४२॥
श्री गुरुचे म्हणणे ऐकून । म्हटले मग ज्ञानदेवानं । काय म्हणाला तो कृष्ण । ऐका आता ॥१४३॥
हे अर्जुना अंतरंग डोहात । प्रवेशले जे गहन समाधीत । स्थिरावणे मग आत्मतत्त्वात । ती ब्रह्ममयता ॥१४४॥
आत्मज्ञान ते होता । जाणता आपली विश्वात्मकता । मग आंतरिक ती परब्रह्मता । प्रकटे तेथे ॥१४५॥
ऐसे ज्ञान ते होता । संपते ती पृथक अहंकारता । मग प्रकटे निष्कामता । त्यांचे अंतरी ॥१४६॥
जे इंद्रियभोगातून सुटले । नि मन इच्छेतून तुटले । तयांचे संदेह सर्व फिटले । होता आत्मज्ञान ॥१४७॥
विषयासी तादात्म्य तुटता । मनइंद्रियांपलीकडे जाता । आत्मस्वरूपी स्थिर होता । न उरे देहबुद्धि ॥१४८॥
अनुभवून ती ब्रह्ममयता । ब्रह्मच झाले ते स्वत: । अनुभवणे ऐसी ब्रह्ममयता । तेचि ज्ञान ॥१४९॥
ते ऐसे कैसेनि जाहले । जे देहीच ब्रह्मत्वा आले । हे जर पुससी भले । तर ऐक आता ॥१५०॥
वैराग्याच्या त्या आधारे । विषय तोडले ते सारे । मग मन एकाग्रतेच्या द्वारे । साधली धारणा ॥१५१॥
धारणा ती साधणे । निर्विकल्प मन होणे । स्वप्न सुषुप्ती ओलांडणे । ती ब्रह्ममयता ॥१५२॥
ऐसे विषयापासून सुटणे । मनोवासना निरसणे । द्वैत अनुभवातून सुटणे । सूत्र अर्जुना ॥१५३॥
नदीनाल्यांना सामावून । जैसे गंगेचे समुद्री मीलन । मग समुद्री एकरूप होणं । ती ब्रह्ममयता ॥१५४॥
गगनी मन लय पावता । अनुभवा येते ती ब्रह्ममयता । सर्व वासनांची चिंता । सरे तेथे ॥१५५॥
पडदा फाटता तो मनाचा । भ्रम संपतो मीपणाचा । जैसे नाश होतो प्रतिबिंबाचा । आटता सरोवर ॥१५६॥
मनाचे मनपण संपता । कैची मग ती अहंभावता । अंतरीची ब्रह्ममयता । अनुभवा येई ॥१५७॥
हे मी मागेही सांगितले । ज्यांनी देहीच ब्रह्मत्व अनुभवले । ते याच मार्गे गेले । जाण अर्जुना ॥१५८॥
ओलांडून यमनियमांचे डोंगर । पोहून अभ्यासरूपी सागर । गाठले ते पैलतीर । त्यांनी अर्जुना ॥१५९॥
मन करून ते निर्विकल्प । पंचभूतांचे घेतले माप । ऐसे मग ते ब्रह्मरूप । झाले अर्जुना ॥१६०॥
योगाचा उपदेश ऐकून । चकित जाहला तो अर्जुन । अद्‌भुत ते ब्रह्मज्ञान । कानी पडले ॥१६१॥
तयाचे आश्चर्य जाणून । मग म्हणाला तो श्रीकृष्ण । संतोषले ना अंत:करण । संपूर्ण आता ॥१६२॥
मग अर्जुन म्हणाला देवासी । देवा तू मनकवडा असासी । जाणलेस मनासी । माझिया तू ॥१६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मला जे विचारावे वाटते। देवा तुला आधीच ते कळते। योगास अधिक विस्तारून ते। सांग मजला ॥१६४॥
कठीण पोहण्याची खटपट। जी अतिभीतिदायक गोष्ट। पोहण्याहून सोपी ही पायवाट। भगवंता जैसी ॥१६५॥
जरी ज्ञान सोपे हे सांख्याहून।कठीण ते आम्हा समजणं।काही वेळ निश्चित लागेन। समजण्या आम्हा ॥१६६॥
भगवंता मी करतसे विनवणी। करावी पुन्हा ती उजळणी। सांगावा योग विस्तारुनी। तुम्ही आता ॥१६७॥
मग श्रीकृष्ण अर्जुनासी म्हणाला। जर तुला मार्ग हा आवडला। मग मी वर्णितो योगाला। तुझ्यासाठी ॥१६८॥
योग जर तू ऐकून। करशील जर तू अनुसरण। मग योग तो सांगणं। कर्तव्य माझे ॥१६९॥
आधीच श्रीकृष्ण करुणावान। त्यात भेटला लाडका अर्जुन। मग प्रेमाचं ते उफाळणं। आपोआप ॥१७०॥
होऊन करुणेची ती वृष्टी। प्रकटेल स्नेहाची ती सृष्टी। ऐसी भगवंताची दृष्टी। अलौकिक ॥१७१॥
देवाची दृष्टी अमृतावाणी। प्रेमाकारणे गेली मोहुनी। मग पडली ती गुंतूनी। अर्जुनाठायी ॥१७२॥
जितके ते बोलावे। तितके विषयांतर व्हावे। अवघे बोल आघवे। अपूर्णताच की ॥१७३॥
जरी त्या शब्द बोलाच्या कारणे।तत्त्वाचे ज्ञान न होणे।तैसे स्वत:चाही विस्तार न जाणे। ते आत्मतत्त्व ॥१७४॥
मन अर्जुनाचे ते जाणून। मोहित जाहला तो भगवान। मग म्हणाला आपणहून। ऐक आता ॥१७५॥
अर्जुना ज्या ज्या रीतीनं। होईल तुला आकलन। तैसाच मी सांगेन। योग तुजला ॥१७६॥
कशास म्हणती योग। काय तयाचा उपयोग। संपूर्ण तो अष्टांगयोग। ऐकशील तू ॥१७७॥
ऐसे जे जे काही। उपयुक्त असे तुज ठायी। अवघेच ते सर्वही । सांगेन तुजला ॥१७८॥
काय म्हणाले भगवान। ऐका तुम्ही चित्त देऊन। अलौकिक योग वर्णन। आहे पुढे ॥१७९॥
भगवंताने त्या अर्जुनास। जो केला असे उपदेश। सांगेन पहा निवृत्तिदास। तुम्हालागी ॥१८०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे संन्यासयोगोनाम पंचमोऽध्याय: ॥५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्‌गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात.  (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०